## नवी मुंबई महानगरपालिका

## मा.प्रशासक तथा आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

**मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२० रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| विषय क्र.०१.<br>दि. २४ नोव्हेंबर, २०२० | विष्णूदास भावे नाट्यगृहाचे भाडे दर ७५% कमी करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २४/११/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/विभाना/३४३/२०२०. |
| ठराव क्र.३४३ | "उपरोक्त संदर्भात विष्णूदास भावे नाट्यगृहाचे भाडे दर ७५% कमी करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे पर्यटन व सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि.५ नोव्हेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील नाटयगृहे ५०% क्षमतेनुसार सुरु करणेबाबत निर्देशित केले आहे. त्याअनुषंगाने जागतिक मराठी नाटयधर्मी निर्माता संघ यांनी पत्र दिले आहे. सदर पत्रानुसार प्रयोगासाठी होणारा खर्च आणि येणारे उत्पन्न याचा ताळमेळ बसू शकत नाही. तिकीट दर वाढवणे अव्यवहार्य ठरेल. तसेच या व्यवसायावर अवलंबून असणारा वर्ग खूप मोठा आहे. आपला सांस्कृतिक वारसा पुढे चालू राहण्यासाठी नाटय प्रयोग करणे अपरिहार्य आहे. नाटयगृहाच्या भाडे दरामध्ये ६ महिने म्हणजेच ३१ मे पर्यंत किंवा ५०% उपस्थितीचा निर्बंध असेपर्यंत नाटय प्रयोगांचे नाटयगृह भाडे संपूर्णत: माफ करणेबाबत विनंती केलेली आहे. नाटय व्यवसाय सुरळीत होण्यासाठी त्यांना ही गोष्ट आत्यंतिक गरजेची आहे. याबाबत जागतिक मराठी नाटयधर्मी निर्माता संघ व मा.आयुक्त यांच्यात दि.०५ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या बैठकीत कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये नाटकास प्रेक्षकांची संख्या कमी असण्याची शक्यता आहे. नाटय प्रयोग करावयाचे असल्याने व मराठी रंगभूमीस चालना देण्याच्या दृष्टीकोनातून मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार ५०% आसनक्षमतेनुसार नाटयगृह सुरु करावयाचे असल्याने मराठी रंगभूमीशी निगडीत मराठी कार्यक्रमाकरीताच दि.३१/०५/२०२१ पर्यंत अथवा ५०% आसन क्षमता निर्णय रद्द होईपर्यंत अथवा हे दोघांपैकी जे अगोदर होईल तोपर्यंत नाटयगृह भाडे दरामध्ये न्युनतम दराच्या ७५% सूट देणेबाबत, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मंजूरी देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>विष्णूदास भावे नाट्यगृहाचे भाडे दर ७५% कमी करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक ३४३ प्रस्तावित केल्याप्रमाणे पर्यटन व सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि.५ नोव्हेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील नाटयगृहे ५०% क्षमतेनुसार सुरु करणेबाबत निर्देशित केले आहे. त्याअनुषंगाने जागतिक मराठी नाटयधर्मी निर्माता संघ यांनी पत्र दिले आहे. सदर पत्रानुसार प्रयोगासाठी होणारा खर्च आणि येणारे उत्पन्न याचा ताळमेळ बसू शकत नाही. तिकीट दर वाढवणे अव्यवहार्य ठरेल. तसेच या व्यवसायावर अवलंबून असणारा वर्ग खूप मोठा आहे. आपला सांस्कृतिक वारसा पुढे चालू राहण्यासाठी नाटय प्रयोग करणे अपरिहार्य आहे. नाटयगृहाच्या भाडे दरामध्ये ६ महिने म्हणजेच ३१ मे पर्यंत किंवा ५०% उपस्थितीचा निर्बंध असेपर्यंत नाटय प्रयोगांचे नाटयगृह भाडे संपूर्णत: माफ करणेबाबत विनंती केलेली आहे. नाटय व्यवसाय सुरळीत होण्यासाठी त्यांना ही गोष्ट आत्यंतिक गरजेची आहे. याबाबत जागतिक मराठी नाटयधर्मी निर्माता संघ व मा.आयुक्त यांच्यात दि.०५ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या बैठकीत कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये नाटकास प्रेक्षकांची संख्या कमी असण्याची शक्यता आहे. नाटय प्रयोग करावयाचे असल्याने व मराठी रंगभूमीस चालना देण्याच्या दृष्टीकोनातून मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार ५०% आसनक्षमतेनुसार नाटयगृह सुरु करावयाचे असल्याने मराठी रंगभूमीशी निगडीत मराठी कार्यक्रमाकरीताच दि.३१/०५/२०२१ पर्यंत अथवा ५०% आसन क्षमता निर्णय रद्द होईपर्यंत अथवा हे दोघांपैकी जे अगोदर होईल तोपर्यंत नाटयगृह भाडे दरामध्ये न्युनतम दराच्या ७५% सूट देणेबाबत, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| सही/-<br>(चित्रा बाविस्कर)<br>नगरसचिव<br>नवी मुंबई महानगरपालिका | सही/-<br>(अभिजीत बांगर)<br>आयुक्त तथा प्रशासक<br>नवी मुंबई महानगरपालिका |

| | |
|---|---|
| विषय क्र.०२.<br>दि. २४ नोव्हेंबर, २०२० | सार्वजनिक रुग्णालय, वाशी या रुग्णालयात तातडीची बाब म्हणून वाढीव Central Medical Oxygen Gas Pipeline System ची उभारणी करुन कार्यान्वित करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २४/११/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य/११५८५/२०२०. |
| ठराव क्र.३४४ | "उपरोक्त संदर्भात सार्वजनिक रुग्णालय, वाशी या रुग्णालयात तातडीची बाब म्हणून वाढीव Central Medical Oxygen Gas Pipeline System ची उभारणी करुन कार्यान्वित करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे M/s Reubens Hospitech Pvt Ltd. यांनी सादर केलेला प्रस्ताव स्विकारण्यास व त्यासाठी अपेक्षित खर्च रुपये १,६०,८०,४५०/- (अक्षरी रुपये एक कोटी साठ लक्ष ऐंशी हजार चारशे पन्नास मात्र ) यांस तसेच सदर एजन्सिने दोन वर्षाची Warranty कालावधी संपल्यानंतर पुढील आठ वर्षाकरीता कामावर कामावर प्रत्यक्ष झालेल्या एकूण खर्चामधून Written Down Value पध्दतीने घसारा रक्कम वजा जाता प्रत्येक वर्षाच्या येणा-या रकमेवर १%/ दराने AMC देणे आहे यांस मान्यता असावी प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९४९ च्या कलम ६७(३)(क) अन्वये मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>सार्वजनिक रुग्णालय, वाशी या रुग्णालयात तातडीची बाब म्हणून वाढीव Central Medical Oxygen Gas Pipeline System ची उभारणी करुन कार्यान्वित करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक ३४४ प्रस्तावित केल्याप्रमाणे M/s Reubens Hospitech Pvt Ltd. यांनी सादर केलेला प्रस्ताव स्विकारण्यास व त्यासाठी अपेक्षित खर्च रुपये १,६०,८०,४५०/- (अक्षरी रुपये एक कोटी साठ लक्ष ऐंशी हजार चारशे पन्नास मात्र ) यांस तसेच सदर एजन्सिने दोन वर्षाची Warranty कालावधी संपल्यानंतर पुढील आठ वर्षाकरीता कामावर कामावर प्रत्यक्ष झालेल्या एकूण खर्चामधून Written Down Value पध्दतीने घसारा रक्कम वजा जाता प्रत्येक वर्षाच्या येणा-या रकमेवर १%/ दराने AMC देणे आहे यांस मान्यता असावी प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९४९ च्या कलम ६७(३)(क) अन्वये मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका